**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 05.08.2025** **वार- मंगळवार**

---

**गुरुदत्त**

ज्येष्ठ चित्रपट अभिनेते आणि दिग्दर्शक गुरूदत्त यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त पुण्यात येत्या ७ ते १० ऑगस्ट या कालावधीत विशेष चित्रपट महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयात होणाऱ्या या चार दिवसांच्या महोत्सवात गुरुदत्त यांच्या प्यासा, कागज के फूल, चौदवी का चाँद, साहिब बीवी और गुलाम, आर पार, मिस्टर अ‍ॅण्ड मिसेस ५५ यासारख्या काही गाजलेल्या चित्रपटांचा आस्वाद चित्रपट रसिकांना घेता येणार आहे.

**इस्त्रोनासाभेट**

पुणे जिल्हा परिषदेच्या शाळांतील २३५ विद्यार्थी इस्त्रो आणि नासा संस्थांच्या भेटीसाठी आंतरविद्यापीठ खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्र केंद्रात मुलाखती देणार आहेत. त्यातील ७५ विद्यार्थ्यांची निवड केली जाईल. उर्वरित विद्यार्थ्यांना राष्ट्रपती भवनासह देशातील आयसर आणि अन्य काही नामांकित वैज्ञानिक संस्थांना भेट देण्यासाठी पाठवलं जाणार आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी नुकतीच ही माहिती दिली.

**अग्निवीर**

राज्यातील अग्निवीर आणि नियमित उमेदवारांच्या लष्करातील भरतीसाठी येत्या ९ ते १९ ऑगस्ट या कालावधीत पुण्यात तर ३ ते १३ सप्टेंबर या कालावधीत नागपूरमध्ये भरती मेळावे होणार आहेत. पुण्यात दिघी इथल्या बॉम्बे इंजीनियर ग्रुप केंद्रात होणाऱ्या भरती मेळाव्यात  पुणे, अहिल्यानगर, बीड, लातूर, धाराशिव आणि सोलापुर जिल्ह्यातील उमेदवारांची चाचणी घेण्यात येईल, तर नागपुरमध्ये होणाऱ्या मेळाव्यात नागपुर, वर्धा, वाशिम, अमरावती, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपुर, अकोला आणि यवतमाळ जिल्ह्यातील उमेदवारांची चाचणी होणार आहे.

**प्रभागरचना**

पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रारूप प्रभाग रचना राज्य सरकारच्या नगरविकास विभागाला काल सादर करण्यात आली. त्यानंतर राज्य निवडणुक आयोगाच्या निर्देशानुसार प्रत्येक प्रभाग तयार केला की नाही याची छाननी उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्यापुढे सुरू आहे.  हा प्रारूप आराखडा नगरविकास विभाग ६ ते ११ ऑगस्टदरम्यान राज्य निवडणूक आयोगाला सादर करणार आहे. निवडणूक आयोग २२ ते २८ ऑगस्ट दरम्यान, प्रारूप प्रभाग रचना जाहीर करण्यासाठी तो महापालिकेला पाठवेल. त्यानंतर प्रारूप प्रभाग रचनेवर हरकती आणि सूचना मागवण्यात येणार आहेत.

**तक्रारी**

पुणे शहरातल्या अनेक रस्त्यांवरच्या पदपथांची दुरवस्था झाल्याच्या तक्रारी महापालिकेकडं दाखल होत आहेत. या तक्रारींची दखल घेऊन पदपथांची पाहणी करण्याचा निर्णय पुणे महापालिकेनं घेतला आहे. सुरुवातीच्या टप्प्यात 'मिशन १५ आणि 'मिशन १७ अंतर्गत काम करण्यात आलेल्या २८ रस्त्यांची पाहणी केली जाणार आहे. पथ विभागातील ५५ अधिकारी ही पाहणी करणार असून, त्याचा अहवाल तीन दिवसांनी होणाऱ्या बैठकीत सादर केला जाईल. पुणे महापालिकेच्या पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी आज पत्रकारांना ही माहिती दिली.

**न्यायालय**

लोकांचा न्यायदानावरील विश्वास दृढ करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी न्यायाधीश आणि वकीलांची आहे, असं प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे यांनी नुकतंच केलं. मुळशी तालुक्यातील पौड इथल्या पूर्णवेळ दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर आणि न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालयाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

**जागतिकधम्मपरिषद**-

फुले शाहू आंबेडकर विचार प्रसारक मंडळ आणि वॅट फ्रोम वोंगासाराम मॉनेस्ट्री यांच्या वतीनं बँकॉक इथं जागतिक धम्म परिषदेचं आयोजन करण्यात येणार आहे.

२१ ते २६ ऑगस्ट दरम्यान होणाऱ्या या जागतिक धम्म परिषदेच्या अध्यक्षपदी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे माजी विभागप्रमुख आणि आंबेडकरी चळवळीतील डॉ. दीपक गायकवाड यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. रोहिदास जाधव यांनी दिली आहे.

**गंगवाल-शिवराज-माधवी**

शाकाहाराचे प्रणेते आणि सर्वजीव मंगल प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. कल्याण गंगवाल यांना नुकतंच 'समाज शिरोमणी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. नवचैतन्य सामाजिक संस्था चिखली आणि श्री वर्धमान जैन स्थानकवासी श्रावक संघ दापोडी यांच्या वतीने डॉ. गंगवाल यांच्या ५० वर्षांच्या निःस्वार्थ कार्याचा सन्मान करण्यात आला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर आकाश अंशतः ढगाळ होतं, आज कमाल तापमान ३० तर किमान तापमान २२  पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सियस इतकं नोंदवलं गेलं. उद्याही साधारणपणे असंच हवामान असेल त्याचबरोबर हलक्या पावसाचाही अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**